# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (**जिल्हा**): अहिल्यानगर **P.S.**(**ठाणे**): शनिशिंगनापुर

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0026 **Year** (वर्ष): 2026

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिंनाक आणि वेळ)**:**16/02/2026 21:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (**गुन्ह्याची घटना**):

1. **Day**(दिवस): सोमवार **Date From** (दिंनाक पासून): 16/02/2026
**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिंनाक पर्यंत): 16/02/2026
**Time From** (वेळेपासून): 13:35 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 15:21 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिंनाक ): 16/02/2026 **Time** (वेळ): 16:30 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 026

**Date & Time** (दिंनाक आणि वेळ): 16/02/2026 21:18 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 0.2 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): शनिशिंगणापुर, नेवासा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश भास्कर शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,शनिशिंगनापुर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,शनिशिंगनापुर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9403865681

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय कष्णा ठुबे | | | 1. शनिशिंगणापुर,नेम शनिशिंगणापुर पोलीस स्टेशन , नेवासा, शनिशिंगनापुर ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनाच्या न्थ्रसीन पावडर लावलेल्या 500/ रु.दराच्या 4 नोटा | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दि. 16/02/2026

मी योगेश भास्कर शिंदे, वय 36 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9403865681

मी दिंनाक 16/02/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे कार्यालयात बोलवुन तक्रारदार श्री. युवराज जाधव रा.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर यांचा मोबाईल नंबर 9860522201 देऊन त्यांना संपर्क करुन सोबत दोन शासकीय पंच घेऊन, लाचमागणी होत असल्यास पुढील कारवाई करा असे आदेशीत केले. त्यानंतर आंम्ही तक्रारदार श्री. युवराज जाधव यांचेशी संपर्क केला. तेंव्हा त्यांचेकडे लाचमागणी होत असल्याबाबत त्यांनी सांगितले. त्यामुळे आम्ही दोन शासकीय पंच उपलब्ध केले. त्यानंतर दोन्ही पंच,सापळा टीमचे सदस्य असे शासकीय वाहनाने लाचमागणी पडताळणी, सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या सर्व साहित्यासह छत्रपती संभाजीनगर येथून शनिशिंगणापूर, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर येथे तक्रारदार युवराज जाधव यांचेशी संपर्क करत हजर आलो. त्याठिकाणी तक्रारदार युवराज जाधव यांचा व आम्हा सर्वांचा आपसात परिचय झाला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची लाचमागणी बाबतची तक्रार तोंडी सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना त्यांची तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहुन घेतली. ती पुढील प्रमाणे -

मी युवराज प्रकाश जाधव, वय- 39 वर्ष, व्यवसाय पुजा साहित्यविक्री दुकान, रा.शिवभद्रा रो हाऊसींग, पोलीस कॉलनीजवळ, श्रीरामपूर, ता.श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर, मो.नं. 9860522201, 9270541801

मी वरील प्रमाणे असुन पोलीस स्टेशन शनिशिंगणापूर समोरील वात्सल्य शॉपींग सेंटर येथील गाळा नं.21 मध्ये राहुल जनरल स्टोअर्स व पुजा साहित्य विक्रीचा व्यवसाय करतो. सदर दुकान श्री. पोपटराव कुराट यांचे मालकीचे असुन ते मी भाडे तत्वावर घेतलेले आहे.

माझ्या सदर दुकानासमोर शनिशिंगणापूर देवस्थान येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविंकाच्या गाडया उभ्या राहतात. तसेच माझ्या आजुबाजूच्या दुकानांसमोर देखील भाविंकाच्या गाडया उभ्या राहतात. ज्या दुकानासमोर भाविंकाची गाडी उभी राहिल त्या दुकानातुन भाविक पुजेचे साहित्ये खरेदी करतात. आम्ही भाविंकाना पुजेचे साहित्य विक्री करताना त्या साहित्याचे दर हे शनि शिंगणापूर देवस्थान ट्रस्टने ठरवुन दिलेल्या नियमाप्रमाणेच विक्री करतो. मागील एक वर्षापासुन पोलीस स्टेशन शनिशिंगणापूर येथील ठुबे पोलीस हे आमच्या दुकानासमोर येणाऱ्या भाविंकाच्या गाडया उभा करु देण्यासाठी व कारवाई न करण्यासाठी प्रति महिना 1500/- रुपये हप्ता घेत होते. मागील महिन्यातील व चालु महिन्यातील हप्ता ठुबे पोलीस यांना मी न दिल्यामुळे ते मला दुकानावर येऊन सतत हप्त्याची मागणी करत होते. हप्त्याचे पैसे न दिल्यास तुला खोटया केस मध्ये आडकुन तुझ्यावर कारवाई करील अशा धमक्या देत होते. मला त्यांना हप्त्याचे पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी दि.13/02/2026 रोजी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी गेलो होतो. तेथील अधिकाऱ्यांनी पोलीस अधिक्षक संभाजीनगर यांना माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याचे सांगितले. त्यानंतर मला पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांचा फोन आला त्यावेळी मी त्यांना सोमवारी तुमची टीम माझ्या तक्रारीप्रमाणे

कारवाई करण्यासाठी पाठवा असे सांगितले.
त्याप्रमाणे दि.16/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक संभाजीनगर येथील पोलीस निरीक्षक श्री. योगेश शिंदे, यांनी मला फोनवर संपर्क करुन सोबत दोन शासकीय पंच, व त्यांची टीम असे शनिशिंगणापूर जवळ आले. माझ्याशी तक्रारी बाबत चर्चा केली.
तरी आज दि.16/02/2026 रोजी मी ठुबे पोलीस यांची भेट घेऊन चर्चा करणार आहे. त्यावेळी जर ठुबे पोलीस यांनी माझ्याकडे माझ्या दुकानासमोर भाविकांच्या गाडया उभा राहु देण्यासाठी व कारवाई न करण्यासाठी पैशाची मागणी केली. तर पुढील कारवाई करावी. मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांच्यात व माझ्यात पैश्याचा देण्या घेण्याचा उसणवारीचा व्यवहार नाही. वैर दुश्मनी नाही. वगैरे मजकुराची तक्रार आम्ही, दोन्ही पंच यांनी वाचुन त्यावर सहया केल्या. व त्याप्रमाणे तक्रारी मधील लोकसेवक ठुबे पोलीस नेमणुक पो.स्टे.शनिशिंगणापूर यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.
त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांना लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने मार्गदर्शन करुन, सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन त्यामध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड पंचांचे समक्ष घालुन, व्हाईस रेकॉर्डरचे फोल्डरमध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनीमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार श्री.युवराज जाधव व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 13.35 वा.चालु करुन, तो तक्रारदार श्री.युवराज जाधव यांचे गळयात अडकवुन तक्रारदार श्री.युवराज जाधव व पंच नं. 01 पवन मोरे यांना ठुबे पोलीस, पोलीस स्टेशन शनिशिंगणापूर यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचेकडील दुचाकी मोपेट गाडीवरुन शनिशिंगणापूर पोलीस स्टेशन येथे पाठविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं 1 असे ठुबे पोलीस, यांची भेट घेऊन, आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढुन 14.23 वाजता बंद केला.
आम्ही प्रथम पंच क्रं. 1 यांना ठुबे पोलीस, पोलीस स्टेशन शनिशिंगणापूर यांना भेटण्यास गेल्यानंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार युवराज जाधव असे सोबत पोलीस स्टेशन शनिशिंगणापूर येथे गेलो. त्या ठिकाणी तक्रारदार व मी मिळुन पोलीस ठुबे यांचा शोध घेतला. परंतू पोलीस ठुबे दिसले नाहीत म्हणुन तक्रारदार यांनी ठुबे पोलीस यांना फोन केला. फोनवर ठुबे पोलीस मी आलोच दोन मिनीटात असे बोलले. त्यानंतर बराच वेळ ठुबे पोलीस आले नाही म्हणुन मी व तक्रारदार युवराज जाधव यांनी शनिशिंगणापूर देवाचे मंदीरात जाऊन देवाचे दर्शन केले त्यानंतर तक्रारदार युवराज जाधव यांना ठुबे पोलीस यांचा फोन आला. त्यावेळी ठुबे यांनी विचारले की, कुठंय त्यावेळी तक्रारदार यांनी दाजी आले आहेत त्यांना दर्शन करुन येतो असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार युवराज असे शेटे पार्कींग येथे आलो. तेथे तक्रारदार व साध्या कपडयात आलेले ठुबे पोलीस यांची माझ्या समक्ष भेट होऊन चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या दुकानाचा दोन महिन्याचा थकलेला हप्ता कमी करण्याची विंनती केली. त्यावेळी ठुबे पोलीस यांनी दोन महिन्याचे दिड हजार रुपये प्रमाणे तीन हजार रुपयांची मागणी केली. त्यात तक्रारदार यांनी दुकानाचा धंदा जास्त होत नाही त्यामुळे आज दोन हजार रुपये व उर्वरीत एक हजार रुपये नंतर देतो अशी विंनती केली. त्यावेळी पोलीस ठुबे यांनी ठिक आहे असे मान्य करुन तात्काळ लाचेचे पैसे घेऊन येण्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार युवराज जाधव यांना व्हाईस रेकॉर्डर चालु झाल्यापासुन ते ठुबे पोलीस यांची भेट घेऊन सुरक्षित स्थळी माघारी येईपर्यंत काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी देखील पंच क्रं. 1 यांचे प्रमाणे तोंडी हकीकत सांगीतली.
त्यानंतर आम्ही व्हाईस रेर्कोडर चालु करुन त्यामधील तक्रारदार युवराज जाधव व ठुबे पोलीस यांचेतील लाचमागणी पडताळणी दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांचेशी ठुबे पोलीस यांनी विचारपुस केली त्यावेळी तक्रारदार हे गावाकडं जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी ठुबे पोलीस यांनी " हो जा पण मग इथे कोणालातरी सांगुन जा असे बोलले त्यानंतर तक्रारदार- सांगून जायला काही नाही पण इथं धंदाच नाही. परत मग काय होतं नाही काही, ठुबे पोलीस ऑनलाईन करशिल तु.. नको नको ऑनलाईन नको करु..तक्रारदार काय नाही ऑनलाईन नाही कॅशच देतो तुम्हाला. आणि थोडं ऐका ना, या महिन्यात थोडंसं कमी करा धंदे नाही सध्या. ठुबे पोलीस तसं नको करु युवराज. माझे हाय तेवढे देणं आहे. एक तर तुझे पैसे माझे कमी झाले डायरेक्ट.तक्रारदार कमी करा हजार रुपये प्रमाणे घ्या, ठुबे पोलीस अरे नको रे युवराज एवढं नुकसान मी साहेबाला मग जेवढे आहे तेवढे पैसे देणचं आहे ना, तक्रारदार माझ्या गाड्या कमी झाल्या शिर्डीच्या, ठुबे पोलीस अरे बरोबर आहे पण आता साहेबाला कसं सांगू? साहेब म्हणतो तुझं तू बघून घे. नाहितर माझे पैसे कमी होतील, तक्रारदार आता या महिन्यात देतो तुम्हाला दीड हजार पण मागच्या महिंन्याच थोडं ॲडजस्ट करा, ठुबे पोलीस नाही राव सगळे तसं म्हणू राहिले मला राव. मग मागच्या महिन्याचे देऊन देतो. सगळ्याचेच धंदे विंदे गेले मस्त. धंदे झाले जास्त, तक्रारदार धंदे स्लॅक झाले, ठुबे पोलीस आम्ही महिन्यातून दीड हजार घेतो तुमचं. आम्ही विचारत नाही महिना दीड हजार झाले का रोज दोन हजार झाले.

आमचं काही नाही तुम्ही धंदे करा. महिन्याला लाखोन धंदे झाले तरी आम्ही तुमच्या कडुन दिड हजारच घेणार आहे, तक्रारदार तुम्हाला दोन एक हजार देऊन जाऊ का आज ? पुढच्या महिन्यात करु काहीतरी ॲडजस्ट, ठुबे पोलीस तसं नको करू माझ नुकसान नका करुन युवराज तुम्ही मला तेवढेच दोन पाच हजार रुपये राहते. म्या फक्त गाडीचे पैसे लावले, लटकूचे (एजंट) पैसे नाही चालू, तक्रारदार तुम्हाला हेना आज दोन एक हजार रुपये देतो मी आहे, ठुबे पोलीस हं..,तक्रारदार आणि मी जातो मग पुढच्या हप्त्यात बघू, ठुबे पोलीस बरं दोन हजारान तुमचे लय हाल होणार आहे. असे बोलुन तात्काळ लाचेची रक्कम घेऊन येण्याचे तक्रारदार यांना सांगितल्याचे लोकसेवक ठुबे पोलीस, पो. स्टे.शनिशिंगणापूर यांनी लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. लाचेची रक्कम तक्रारदार यांना तात्काळ आणुन देण्याचे सांगितल्याने वेळे अभावी लाचमागणी पडताळणीतील संभाषणा सविस्तर स्क्रिप्ट नंतर काढण्याची तजवीज ठेवुन, पुढील सापळा कारवाईचे नियोजन सर्वानुमते केले.

त्यानंतर तक्रारदार युवराज जाधव यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- रुपये दराच्या 4 भारतीय चलनी नोटा अशी 2000/- रुपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार युवराज जाधव व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 2,000/- रुपये तक्रारदार युवराज जाधव यांचे अगातील पँटचे उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार युवराज जाधव, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, ठुबे पोलीस, पोलीस स्टेशन, शनिशिंगणापूर यांनी लाच रक्कम स्विकारल्यानतर तक्रारदार यांनी त्यांचे डोळ्यावरील नंबरचा चष्मा डाव्या हाताने काढुन हातात ठेवण्याचा इशारा करण्याचा सुचना दिल्या. त्यानंतर पंचासमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 15.15 वा चालु करुन तो तक्रारदार युवराज जाधव यांचे गळयात अडकवुन तक्रारदार व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी, सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथकातील सदस्य असे आमचेकडील शासकिय वाहनाने शनिशिंगणापूर पोलीस स्टेशन, समोरील पार्कींग परिसरात जावुन तक्रारदार व पंच क्र.1 हे नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 ठुबे पोलीस यांची भेट घेण्यासाठी शेटे पार्कींगकडे पायी चालत निघाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच क्र.2 व पथकातील सदस्य असे शेटे पार्कींगच्या बाजुला दबा धरुन थांबलोत. त्यानंतर 15.21 वा.तक्रारदार युवराज जाधव यांचा लाच स्विकारल्याचा इशारा म्हणुन त्यांनी त्यांचे डोळ्यावरील नंबरचा चष्मा डाव्या हाताने काढुन हातात घेऊन पुर्वनियोजीत इशारा केला. सीसीटीएनएस प्रणालीवर शब्द मर्यादा असल्यामुळे उर्वरीत फिंयाद सोबत जोडली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ashish parshram shelke(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ashish parshram she
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):